# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

मे - ऑगस्ट २०११   वर्ष ४  अंक २   पृष्ठे ८   रु. २/-

## मन कुठल्याही सुरक्षिततेच्या भावनेशिवाय राहू शकतं का?

जाणिवेत सुख आणि वेदना आहेत; वेगवेगळ्या स्तरांवर, वेगवेगळ्या अपेक्षांप्रमाणे दु:ख टाळणं आणि सुखाचा पाठलाग करणं चालू असतं, त्यामुळे फक्त दु:खच नव्हे तर भीतीदेखील निर्माण होते. मन वेगवेगळ्या स्वरूपात शारीरिक, लैंगिक, वासनिक सुखाच्या, पूर्तीच्या सुखाच्या, यशस्वी होण्याच्या सुखाच्या, कशात तरी सुरक्षितता शोधण्यात आणि ती सापडल्यावर तिला पकडून ठेवण्याच्या सुखाच्या शोधात असतं. परंतु असं सुखाचा पाठलाग करणारं मन त्या सुखाच्या उलट म्हणजे दु:खाला आमंत्रण देतं. सुख आणि दु:ख एकत्रच असतात, त्यांना वेगळं करता येत नाही. जेव्हा आपण सुख साकल्याने पाहत नाही तेव्हा ते दोन्ही वेगळे भासतात. सर्व परिस्थितीत सुखाचा पाठलाग, संपूर्ण सुरक्षित असण्याचं सुख, ही प्रक्रिया आपल्या जीवनात चालूच असते. हेच आपण परस्पर नातेसंबंधात देखील शोधत असतो. संपूर्ण सुरक्षित असणं, नाते संबंधात निर्धोक असणं ह्या अपेक्षा दु:खालाच आमंत्रण देतात. कारण मानसिक सुरक्षा अशी काही गोष्टच नाही. अन्न, निवारा ह्यांची हमी असलीच पाहिजे, असं आम्ही म्हटलं आहे, पण मानसिक सुरक्षा असू शकत नाही. तुम्हाला माहीत आहे की हे समजणं ही अत्यंत असाधारण गोष्ट आहे. ह्याचा अर्थ असा नव्हे की जीवन असुरक्षित आहे. परंतु आपण मानसिक सुरक्षा शोधतो आणि त्यामुळे असुरक्षिततेला आमंत्रण देतो. आपल्याला असुरक्षिततेची जाणीव होते आणि ती जेव्हा अधिकाधिक तीव्र भासू लागते तेव्हा त्याचा शेवट मनोरुग्ण बनून हॉस्पिटलमध्ये भरती होण्यात होतो. जेव्हा आपल्याला कळू लागतं की जिथे सुख आहे तिथे दु:खाचं सावट आहे, जेव्हा ते संपूर्ण दिसू लागतं, आपण म्हटल्याप्रमाणे जसं संपूर्ण झाड त्याच्या प्रतिमेशिवाय दिसतं– तेव्हा मानसिक भीतीचा अंत होत असल्याचं दिसेल.

परंतु तुम्ही जेव्हा प्रयत्न करीत असता तेव्हा ते पूर्णपणे पाहू शकत नाही. आपल्याला लहानपणापासून प्रयत्न करायला, धडपड करायला, स्वत:वर आणि इतरांवर मात करायला शिकवलं जातं. धडपड, धडपड, धडपड–मरेपर्यंत धडपड, शाळेत, कॉलेजात, जीवनात, घरात, कुटुंबात, ऑफिसात सर्वत्र धडपड, न संपणारी धडपड. आपण धडपड, संघर्ष, गोंधळ हे जीवनाचा भाग म्हणून स्वीकारतो. जे मन संघर्षात असतं ते धार्मिक असूच शकत नाही. जगभरचे धर्मगुरू, त्यांनी जगाशी संघर्ष टाळला आहे असं समजून जेव्हा संन्याय घेऊन आश्रमांच्या भिंतीआड निवृत्त होतात तेव्हा तो संघर्ष टाळणं म्हणजे संघर्षाचा शेवट नसतो. ते केवळ आंधळेपणे किंवा तथाकथित हुशारीने ठराविक चाकोरीतून जात असतात आणि असुरक्षिततेच्या भीतीने ते ती चाकोरी सोडायला धजत नाहीत. चाकोरीला पकडून राहण्यात त्यांची सुरक्षा असते आणि म्हणून ते संपूर्णपणे असुरक्षित असतात. मन सतत संरक्षण शोधत असतं आणि म्हणूनच धोक्याला घाबरतं. हा सुरक्षिततेचा पाठलाग म्हणजेच भीतीला जन्म देणं. मन सुरक्षिततेच्या कुठल्याही भावनेशिवाय राहू शकेल का? ह्याचा अर्थ मन निराश, कडवट, दोष काढणारं बनावं असा नव्हे. मनाला जेव्हा कळेल की सुरक्षिततेची अपेक्षा हीच असुरक्षितता आणि भीतीला कारणीभूत आहे, तेव्हा ते सुरक्षिततेच्या सर्व भावनेतून मुक्त होईल. ते तुम्ही तेव्हाच पाहू शकाल, साकल्याने पाहू शकाल, जेव्हा पाहणारा आणि पाहिले जाणारे एकच असतात. जिला तो भीती म्हणून पाहतो ती भीती म्हणजेच बघणारा असतो, तेव्हाच भीतीचा अंत होतो आणि त्या स्थितीत संघर्ष नसतो. जे मन क्लेश आणि संघर्ष या सर्वांपासून दूर असतं, तेच मन विभाजनाशिवाय समग्रतेने अस्तित्व पाहू शकतं. केवळ तेच मन धार्मिक असतं, तेच मन सत्य पाहू शकतं; तळमळणारं, शिस्तबद्ध, दबावाखाली जगणारं, धडपडणारं, कडवट, उपहासिक किंवा सामाजिकदृष्ट्या चांगलं कार्य करणारं मन नव्हे. धार्मिक मनाशिवाय जगात शांती नांदणार नाही.

पॅरिस १९६७, भाषण १

---

## जीवन आपल्याला एकटे सोडीत नाही

आपण आपल्या घराची खिडक्याद्वारे बंद करून आत बसलो तर आपण सुरक्षित, निर्धास्त आहोत असे आपल्याला वाटते. पण जीवन असे नसते. जीवन आपल्या दरवाजावर नेहमी धडका देत असते, आणि आपल्याला काहीतरी जास्त कळावे, दिसावे म्हणून खिडक्या उघडण्याचा प्रयत्न करीत असते. आणि आपण भिऊन जर दरवाज्यांना कुलपे घातली व खिडक्यांना कड्या घातल्या तर या धडका अधिकच जोरात बसू लागतात. कोणत्याही सुरक्षिततेला आपण जितके जास्त बिलगू तितके जीवन आपल्याला जास्त जोरात धक्के देते. आपण जितके जास्त भिऊ आणि स्वत:ला कोंडून घेऊ तितके जास्त आपले दु:खच वाढते, कारण जीवन आपल्याला एकटे सोडीत नाही. आपल्याला निश्चित सुरक्षित व्हावेसे वाटते. पण जीवन म्हणते, 'आपल्याला ते शक्य नाही,' म्हणून मग आपला झगडा सुरू होतो. आपण समाजात, रूढीमध्ये, आपल्या आई-वडिलांजवळील संबंधात, आपल्या पतीजवळील किंवा पत्नीजवळील संबंधात सुरक्षितता शोधीत असतो पण जीवन हे सुरक्षिततेच्या सर्व भिंती पाडून आत घुसत असते.

*भावी जीवन*, प्र. ६

संपादकीय

आपल्या कुठल्याही आचरणाचे वैज्ञानिक स्पष्टीकरण शोधताना आपण उत्क्रांतीकडे वळतो. आजच्या अत्यंत अस्थिर आणि असुरक्षित जगात सुरक्षिततेची गरज उत्कट होत चालली आहे; याचे मूळ कशात आहे? प्राणिमात्राच्या इतिहासात त्याचा कुठे उगम आहे? कृष्णमूर्ती म्हणतात, जीवमात्राला बाह्य सुरक्षा हवी असणे हे नैसर्गिक आहे. पण तिचे मानसिक सुरक्षेत रूपांतर होणे हे संघर्ष आणि समस्येचे कारण आहे. आपल्या शारीरिक असुरक्षिततेचे मूळ आपल्या मानसिक सुरक्षेच्या हव्यासामध्ये आहे. अन्न, निवारा ह्यांची तरतूद करणे ही प्राणिमात्राची उपजत गरज असते, त्यात माणूस देखील आला; आणि ते मिळवण्याची क्षमतासुद्धा असते. ते सहज असते, त्यात चलाखी नसते.

नव्या नव्या क्षमता प्राप्त झालेल्या माणसाने उपजत असलेल्या संरक्षणाच्या गरजेला अवास्तव महत्त्व दिले. जगातील उत्पन्नाच्या ऐंशी टक्के उत्पन्न संरक्षणावर खर्च होते असे म्हटले जाते. युद्धे, आतंकवाद, देश, धर्म, जात हे मानसिक सुरक्षेच्या हव्यासाचे प्रकटीकरण आहे. शारीरिक सुरक्षा व मानसिक सुरक्षा ह्यातील रेखा अस्पष्ट होत चालल्या आहेत, गरज आणि हाव ह्यातील रेखादेखील धूसर, अस्थिर झाल्या आहेत.

आणखी एका महत्त्वाच्या मुद्याकडे कृष्णमूर्ती लक्ष वेधतात. आपले परस्परसंबंध आणि त्यावर अवलंबून असणे हे आपल्या सुरक्षेच्या गरजेवर आधारीत असतात. आपण प्रेम म्हणतो ते देखील आपल्या सुरक्षेशी जोडलेले असते. हे समजणे व पचवणे खूप कठीण आहे. परंतु आपल्या प्रत्येक आचरणाच्या व विचारामागच्या भावना तटस्थपणे तपासल्या तर लक्षात येईल. त्यात कुठेतरी सूक्ष्म सुरक्षिततेच्या गरजेचा ओघ असतो. मग आपण प्रेमाचे, नातेसंबंधाचे व त्यासाठी केलेल्या त्यागाचे खरे स्वरूप पाहू शकू. त्यागसुद्धा खरे तर स्वार्थ आहे हे कळेल. जेव्हा हे स्पष्ट दिसू लागते, एक क्षणभर आपल्या मनाची ही सूक्ष्म चाल दिसते, तेव्हा क्षणभर का होईना, पांघरलेली सर्व सोंगे गळून पडत आहे असे वाटणे ही एक क्षणिक मुक्तीची भावना, की निखळ प्रामाणिकपणाची भावना?

---

## या जीवनात माणसाला निखळ सुरक्षितता असू शकते का?

*प्रश्न:* या जीवनात माणसाला निखळ सुरक्षितता असू शकते का?

*कृष्णमूर्ती:* हा अगदी गंभीर प्रश्न आहे. आम्हा सगळ्यांना सुरक्षितता पाहिजे असते. शारीरिक आणि मुख्यत: मानसिक–दोन्हीही. जर आपण मानसिकदृष्ट्या सुरक्षित, निश्चिंत असू, तर मग आपण शारीरिक सुरक्षिततेसाठी इतके विवंचित असणार नाही. मानसिक सुरक्षिततेचा शोध शारीरिक सुरक्षेत प्रतिबंध करीत असतो.

प्रश्नकर्ता विचारतो आहे की, मानवासाठी केवळ सुरक्षितता असते का? आपल्याला सुरक्षितता पाहिजे – लहान मूल जसं आईला चिकटून असतं. जर आईवडील मुलाकडे पुरेसं लक्ष देत नसतील, जर मुलाला प्रेम आणि संरक्षण देत नसतील, तर त्या मुलाच्या मेंदूवर आणि मज्जासंस्थेवर परिणाम होतो. लहान मुलाला शारीरिक संरक्षण आवश्यक आहे. आता आपण मानसिक सुरक्षिततेची मागणी का करतो? तिथे मानवी मन आहे जे सुरक्षिततेची मागणी करीत असतं; परंतु खरोखरच मानसिक सुरक्षितता असते का? आपल्याला आपल्या नातेसंबंधांमध्ये सुरक्षितता पाहिजे असते– माझी पत्नी, माझी मुलं, कुटुंब. त्या आसक्तीमध्ये तिथे एक प्रकारची सुरक्षितता आहे, असं आपल्याला वाटतं. परंतु जेव्हा आपल्याला समजतं की तिथे सुरक्षितता नाही तेव्हा लगेच आपण तेथून बाहेर पडतो आणि दुसरीकडे कुठेतरी सुरक्षितता शोधतो.

आपण एखाद्या गटामध्ये सुरक्षितता शोधण्याचा प्रयत्न करतो, जमातीमध्ये–राष्ट्रामध्ये; राष्ट्र – जे खरं तर गुणगान केलं गेलेली, मोठेपणा दिलेली जमातच असते. आणि ते राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध असतं. व्यक्तीमध्ये, देशामध्ये, श्रद्धेमध्ये, तुमच्या स्वत:च्या अनुभवामध्ये सुरक्षितता आहे, असा मानसिकदृष्ट्या विचार करणं म्हणजे शारीरिक सुरक्षिततेची मागणी करण्यासारखंच असतं. मानसिक सुरक्षिततेची मागणी करताना आपण आपल्यामध्येच भेद निर्माण केले आहेत. हिंदू, मुसलमान, ज्यू, अरब, येशूमध्ये विश्वास ठेवणारा, दुसऱ्या कशावर तरी विश्वास ठेवणारा – या सर्वांमध्ये मानसिक सुरक्षिततेची मागणी असते. या भ्रामक समजूतींमध्ये मानसिक सुरक्षिततेचा पाठलाग असतो. कॅथोलीसिझम्, बुद्धिझम्, हिंदुइझम्, ज्युडाइझम्, इस्लाम इ. या सर्वांमध्ये सुरक्षित असल्याचा भ्रम. या साऱ्यांनी फक्त भ्रामक सुरक्षितता निर्माण केली आहे. कारण ते सर्व एकमेकांविरुद्ध लढत असतात. ज्या क्षणी तुम्ही हे सर्व पाहता, तेव्हा तुम्ही कोणालाही आसक्त राहत नाही. जेव्हा तुम्ही हे सत्य पाहता की मन किंवा विचार याने या भ्रमामध्ये सुरक्षितता शोधली आहे, तेव्हा ते प्रत्यक्ष दर्शनच प्रज्ञा घेऊन येतं.

एखादा जण हिंदू धर्मामधील श्रद्धेमधून सुरक्षितता शोधत असतो, त्यातील सर्व निरर्थक धर्मभोळेपणा, देवदेवता, धार्मिक विधी या साऱ्यांसकट हिंदू असण्यामध्ये सुरक्षितता शोधत असतो. परंतु हे सर्व ज्या दुसऱ्या समाजाच्या अनेकविध धर्मभोळ्या समजूती असतात त्याच्या विरोधात असते. निरनिराळे धर्मभोळ्या समजूती, भिन्न देव, निरनिराळे धार्मिक विधी हे सर्व एकमेकाविरोधी असते. हे दोन्ही समाज घटक एकमेकांना सहन करीत असतील, परंतु ते मूलत: एकमेकांविरोधी असतात. त्या दोघामध्ये संघर्ष असतो. कोणी एका गटात नाहीतर दुसऱ्या गटात सुरक्षितता शोधलेली असते आणि मग त्याला समजतं की ते दोन्ही भ्रमांवर आधारलेले आहेत. ते पाहणं हीच प्रज्ञा असते. एखादा धोका पाहण्यासारखं ते आहे. जो मनुष्य हा धोका पाहू शकत नाही तो मूर्ख असतो. त्याच्यामध्ये काहीतरी गडबड असते. परंतु आपण ज्यामध्ये सुरक्षितता शोधत असतो त्या सुरक्षिततेच्या भ्रमामधील धोका आपण पाहत नाही. ज्या माणसामध्ये प्रज्ञा जागृत असते तो हा धोका पाहतो. त्या प्रज्ञेमध्येच केवळ सुरक्षितता असते. विचारानेच भ्रमाचे हे निरनिराळे प्रकार निर्माण केलेले आहेत – राष्ट्रीयत्व, वर्ग, अनेक देव, अनेक श्रद्धा, निरनिराळी ठाम मतं, अनेकविध धार्मिक विधी आणि असाधारण धर्मभोळ्या समजूती, ज्यांनी हे सगळं जग व्यापलेलं आहे आणि त्यामध्ये विचाराने सुरक्षितता शोधली आहे. आणि आपण हा भ्रामक सुरक्षिततेमधील धोका पाहत नाही. जेव्हा आपण हा धोका पाहतो – कल्पना म्हणून नव्हे तर प्रत्यक्ष वस्तुस्थिती म्हणून– तेव्हा ते पाहणं म्हणजेच प्रज्ञा असते. त्यामध्येच अत्युच्च स्तरावरची सुरक्षितता असते. मग तिथे निखळ सुरक्षितता असते. असत्यामधील सत्य पाहायचं असतं.

ब्रॉकवुड पार्क, १९७९, प्रश्नोत्तर सभा १

## यातील कशातही पूर्णतः सुरक्षितता नसते

अत्यंत गोंधळ माजलेल्या, मन अस्वस्थ करणाऱ्या, धोकादायक बनलेल्या आणि युद्धाची तयारी करीत असलेल्या या जगात आपल्याला साहजिकच कुठल्या ना कुठल्या तऱ्हेची सुरक्षितता हवी असते, आपल्या बाहेरील जगात आणि अंतर्मनात. बाहेरील जगात फारशी सुरक्षितता नाही आहे. तुम्ही खूप श्रीमंत असाल, राजकीयदृष्ट्या अत्यंत सामर्थ्यशाली असाल, किंवा एखाद्या मतप्रणालीमध्ये, एखाद्या समजुतीमध्ये सुरक्षितता शोधत असाल. परंतु यातील कशातही पूर्णतः सुरक्षितता नसते. माणसाला सुरक्षितता हवी असते. आपल्या सर्वांना सुरक्षितता असली पाहिजे – अन्न, वस्त्र आणि निवारा या दृष्टीने सुरक्षितता. आपल्याला आंतरिक सुरक्षितताही हवी असते, असं काहीतरी जे आपल्याला हमी देईल, स्थैर्य देईल, सामर्थ्याची जाणीव देईल. पण कुठल्याही समजुतीमध्ये, ठाम मतप्रणालीमध्ये, आदर्शांमध्ये सुरक्षितता नसते. या कशातही सुरक्षितता न सापडल्यामुळे माणूस भूतकाळाकडे वळतो आणि आधार घेण्यासाठी कुठलेतरी शब्द, काहीतरी आशादायी सापडेल अशी अपेक्षा करतो.

तुमच्या हे लक्षात आलं आहे की नाही हे मला माहीत नाही – कोणत्याही प्रकारच्या निष्कर्षाला जेव्हा तुम्ही बिलगून राहता, मग तो रास्त निर्णय असो, तर्कशुद्ध निर्णय असो किंवा एखाद्या अधिकारमंडळाचा निष्कर्ष असो; तेव्हा तेथे ऊर्जेची कमतरता असते. जेथे निष्कर्ष असतो तेथे ऊर्जेचा अभाव असणारच. कारण जेव्हा तुम्ही निष्कर्षाप्रत पोहोचता, म्हणजे चर्चा, विवाद केल्यानंतर तुम्हाला जे योग्य वाटते अशा टप्प्याला पोहोचता – तेव्हा तुम्ही त्यापुढील चौकशीचा, शोधाप्रतचा दरवाजा बंद करता आणि जगात हेच घडत आहे. आपल्या सर्वांना निष्कर्ष हवे असतात, मग ते देव आहे का याबद्दल असोत की थोडीतरी शांतता नांदणार आहे की नाही याबद्दल असोत. आपल्यामध्ये आंतरिक आणि बाह्य शांततेचा अभाव असतो. ज्यावर आपण विसंबून राहू शकू, जे आरामदायी असेल, ज्याच्यामुळे सगळं काही ठीक असल्याची भावना आपल्याला होईल अशा गोष्टींचा आपल्याकडे अभाव असतो. त्यामुळे आपण काही पारंपारिक निष्कर्षांना बिलगून राहतो आणि शोध घेण्याची ती सृजनशील ऊर्जा गमावून बसतो. पृच्छा करणं म्हणजे विषयात शिरणं, बारकाईने पूर्ण चौकशी करणं, शोध घेणं, दार उघडणं, त्यापुढील गोष्टी गवसणं असतं. परंतु आपल्यापैकी बहुतेक जणांजवळ ती ऊर्जा नसते. आणि म्हणून आपण ज्याला परंपरा म्हणतो अशा काही गोष्टींचा किंवा एखाद्या पुस्तकाचा आसरा घेतो.

*Mind without Measure*, कलकत्ता १९८२, भाषण २

## फक्त त्या प्रज्ञेमध्येच पूर्ण सुरक्षितता असते

आसक्ती हे दुःखाचे कारण असतं का? मी माझ्या पत्नीशी, माझ्या मुलाशी, माझ्या स्मृती, माझ्या श्रद्धा, माझे अनुभव या सर्वांना धरून आहे. मी त्यांच्यामध्ये अडकलेलो आहे. मी विश्वास ठेवतो आणि मी त्या श्रद्धेला धरून आहे आणि जेव्हा त्या श्रद्धेलाच आव्हान दिलं जातं, तिच्याविषयी शंका घेतली जाते, तिला हादरा बसतो, तेव्हा तिथे अनिश्चितता येते, दुःख होतं. दुःखाचं ते एक कारण आहे का? सर्व श्रद्धांपासून मुक्त होणं शक्य आहे का? एका विशिष्ट श्रद्धेपासून किंवा विशिष्ट आदर्शापासून नव्हे तर सर्व आदर्शांपासून, सर्व श्रद्धांपासून पूर्णपणे मुक्त. कृपया असं विचारू नका की जर आम्ही सर्व श्रद्धा आणि आदर्शांपासून मुक्त झालो तर त्याची जागा काय घेईल? तो चुकीचा प्रश्न आहे. कुठचीही श्रद्धा, आदर्श ही माणसामध्ये विभाजन निर्माण करते– यामधील सत्य पाहा. मी देव आहे यावर विश्वास ठेवतो किंवा देव नाही यावर. मी एका विशिष्ट तत्त्वप्रणालीवर विश्वास ठेवतो – साम्यवाद, समाजवाद, भांडवलशाही, जे काही असेल ते, ज्यासाठी मी लढायला तयार असतो, लोकांना मारायला तयार असतो. आम्ही त्यावर विश्वास ठेवतो कारण ते आम्हाला काहीतरी संरक्षणाची हमी देतं. तुम्ही देवावर विश्वास ठेवत असाल, जसे तुमच्यापैकी बहुतेकजण करतात. कारण ते तुम्हाला बचावाची, मार्गदर्शनाची, संरक्षणाची जाणीव देतं. मनाने ते शोधून काढलं आहे. मेंदूने त्याचा शोध लावला आहे. सुरक्षिततेच्या या अनेक पद्धती – राष्ट्रवाद, धार्मिक गुरू आणि तथाकथित पवित्र पुस्तकं. या सर्वांनी तुम्हाला संरक्षणाची एक प्रकारची हमी दिलेली आहे. प्रत्यक्षात तेथे मुळीच सुरक्षितता नसते. तो सगळा भ्रम असतो. श्रद्धा, आदर्श हे सगळे अगदी हानीकारक असतात, ते माणसाला माणसापासून निराळे करतात, याचं आकलन होणं, त्यातील सत्य पाहणं म्हणजेच प्रज्ञावंत होणं असतं. फक्त त्या प्रज्ञेमध्येच पूर्ण सुरक्षितता असते. तुमच्या श्रद्धेमध्ये नव्हे, तुमच्या मिथकांमध्ये आणि आदर्शांमध्ये नाही. या प्रज्ञेचा शोध लागणं – आणि ती प्रज्ञा तुमची किंवा वक्त्याची नसते – ती प्रज्ञा असते. म्हणजेच असत्य हे असत्य म्हणून पाहणं असतं आणि त्या असत्याचा अंत करणं असतं. 'जे आहे' ते प्रत्यक्ष पाहणं, कल्पना करणं नव्हे आणि त्यापासून पळणं नसतं, तर आपण जसे आहोत तसं ते प्रत्यक्ष पाहणं. त्या संशोधनामध्येच प्रज्ञेचं जागृत होणं असतं.

नवी दिल्ली, १९८२, भाषण ३

### *सुरक्षितपणाची मागणीच मुळी असुरक्षितपणाला निमंत्रण देते*

परस्परसंबंधात सुरक्षितपणा हवा असा आग्रह धरण्यामुळे शोक व भय उत्पन्न होतात. ते अटळच असते. सुरक्षितपणाची मागणीच मुळी असुरक्षितपणाला निमंत्रण देते. तुमच्या परस्परसंबंधात, नात्यागोत्यात तुम्हाला कधीतरी खात्रीची सुरक्षितता लाभली आहे का? प्रेम करणे व प्रेम करून घेणे यातील एक प्रकारची सुरक्षितता, एक आश्वासन पुष्कळांना हवे असते. पण प्रत्येकजण जर आपलाच बचाव करीत असेल, आपला स्वार्थीपणाचा मार्गच जर चालत असेल तर खरे प्रेम असते का? आपल्याला प्रीतीचा लाभ होत नाही कारण आपण तरी कोठे कोणावर प्रेम करतो? प्रेम कसे करावे हे आपल्यालाच कळत नाही.

*ज्ञातापासून मुक्ती, प्र. १०*

# वृ|त्त|वि|शे|ष

## सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मधील प्रदर्शनात मुंबई केंद्राचा सहभाग








**या** वर्षी देखील जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् येथील कला शाखेतील विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या आनंद मेळावा आणि चित्रप्रदर्शनामध्ये कृष्णमूर्ती फाऊंडेशनच्या मुंबई केंद्राच्या वतीने कृष्णजींच्या इंग्रजी तसेच भाषांतरित मराठी, गुजराथी, हिंदी पुस्तकांचे आणि कृष्णजींच्या भाषणांच्या डिव्हीडीज्‌चा स्टॉल ठेवला होता. हे प्रदर्शन २२ ते २६ फेब्रुवारी २०११ पर्यंत होते.

या कॉलेजमधील तसेच बाहेरील विद्यार्थी व शिक्षकांनी या स्टॉलला भेट दिली. विशेषत: तरुण विद्यार्थ्यांचा तसेच चित्र प्रदर्शन पाहायला येणाऱ्या रसिकांचा प्रतिसाद चांगला होता. मराठी पुस्तकांची विक्री चांगली झाली आणि अंतरलहरी, अंतरमेळ या वृत्तपत्रिका अनेक लोकांपर्यंत पोहोचू शकल्या. या वेळी प्रदर्शनामध्ये विशिष्ट विषयानुसार कृष्णजींच्या लिखाणातील निवडक वेचे आणि त्याला पूरक काही छायाचित्रे असलेली पॅनेल्स प्रथमच ठेवण्यात आली होती आणि स्टॉलला भेट देणाऱ्या विद्यार्थी आणि इतर मंडळींनी त्यांचे जवळून निरीक्षण केले.

---

## आनंद विहार येथील शिक्षकांसाठी कार्यशाळा

**गे**ली कित्येक वर्षे जे. कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीवर आधारित जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी ही संस्था बदलापूरजवळ जांभीळघर येथे अध्ययन केंद्र चालवीत आहे. मुंबईमध्ये बऱ्याच ठिकाणी शैक्षणिक संस्थांमधून शिक्षण, शिक्षक व नवा दृष्टिकोन ह्या संदर्भात कार्यशाळा घेतल्या जातात. बदलापूरमध्ये अशी कार्यशाळा १९ मार्च २०११ रोजी प्रथमच आयोजित करण्यात आली. कार्यशाळेचा विषय होता– *प्रचलित शिक्षणाचे स्वरूप योग्य आहे का?* डॉ. वासंती पडते यांनी या कार्यशाळेचे संचालन केले.

संवादपद्धतीवर आधारित ही एक दिवसीय कार्यशाळा दोन सत्रांमध्ये विभागली होती.

पहिल्या सत्रात माहितीज्ञान, तंत्रज्ञान ह्यांचे शिक्षणात वाढलेले महत्त्व आणि सुज्ञता, मूल्यशिक्षण हे कसे दुर्लक्षिले जाते, याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न झाला. मुलांची भावनिक जोपासना, नैतिक वाढ ह्याकडे लक्ष न देता फक्त ज्ञान दिले तर त्याचा दुरूपयोग होऊ शकतो आणि आज त्याचे दुष्परिणाम समाजात दिसत आहेत ह्याबद्दल चर्चा झाली. मूल्यशिक्षण हे शैक्षणिक विषयापासून वेगळे न करता विषयामधून कसे देता येते ह्याची देखील थोडीशी चर्चा झाली.

दुसऱ्या सत्रात परीक्षा, स्पर्धा, तुलना, मार्कस् ह्या गोष्टींशिवाय उत्कृष्टता शक्य आहे का, हा प्रश्न चर्चिला गेला. उत्कृष्टतेची सीमा प्रत्येक मुलाच्या उपजत क्षमतेप्रमाणे बदलत असते. स्पर्धा नसेल तर शिकण्याचा आनंद, आवड मुलामध्ये जागवता येते. स्पर्धेच्या दबावामुळे मुले चिंता, दु:ख, मत्सर ह्यात जगत असतात व त्याचा परिणाम निराशा, गुन्हेगारी ह्यात होतो. तसेच परीक्षेशिवाय मुलाची प्रगती जाणून घेता येते. त्यासाठी काही पद्धती आपण शोधू शकतो. अशा अनेक गोष्टींची वेळे अभावी थोडक्यात चर्चा झाली.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षकांचा सहभाग चांगला होता. त्यांना अशा चर्चा चालू ठेवण्यात रस होता. एवढ्या थोड्या अवधीत, काही शिक्षकांना आजच्या शिक्षण पद्धतीला दुसरा पर्याय असू शकतो, ज्यात दबावाऐवजी सहज आनंद असतो, हे जाणवले हेच पुरेसे होते.

## भोपाळ आणि इंदूर येथील परिचयात्मक व्हिडिओ आणि संवाद कार्यक्रम

***आपण एकत्रपणे एक चांगला समाज घडवू शकू का?***

– सानेन येथील १९७९ सालचे दुसरे जाहीर भाषण

**म**ध्यप्रदेशमधील भोपाळ आणि इंदूर येथे कृष्णमूर्ती फाउंडेशनचे श्री. जयंत साठे यांच्या मार्गदर्शनाखाली कृष्णजींच्या वरील भाषणांचे व्हिडिओ कार्यक्रम आणि त्यानंतर चर्चासत्र अशा दुहेरी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

भोपाळ येथील चिन्मय मिशन सेंटर येथे ६ मार्च २०११ रोजी झालेल्या खाजगी कार्यक्रमाला २० हून अधिक लोकांची उपस्थिती होती.

तेथे पुस्तके आणि ऑडिओ, व्हिडिओ डिव्हीडीज्‌ची विक्रीदेखील करण्यात आली. प्रा. मुकेश श्रीवास्तव यांच्या प्रयत्नांमुळे कार्यक्रमाचे आयोजन शक्य झाले. संवादसत्रात वेगवेगळ्या स्तरातली, वेगवेगळ्या पेशाची मंडळी सहभागी झाली होती. तरीही चर्चेचा ओघ सूत्रबद्धपणे पुढे नेणं शक्य झालं. यानंतर गौतमनगर येथे एका लहान गटासाठी The Challenge of Change या कृष्णमूर्तींवरील माहितीपटाची हिंदी आवृत्ती दाखविण्यात आली. हिंदी भाषक प्रदेशात झालेला हा पहिलाच कार्यक्रम उत्साहवर्धक होता.

इंदूर येथील शाकुंतल प्रिमायसेस्‌मध्ये १३ मार्च २०११ रोजी आयोजित करण्यात आलेल्या व्हिडिओ कार्यक्रमाला सुमारे ५० जण उपस्थित होते. त्यानंतर सुमारे ३० जणांमध्ये संवाद झाला. येथे पुस्तके आणि डिव्हीडीज्‌ची मोठ्या प्रमाणावर विक्री झाली. श्री. समीर गोळवेलकरांच्या उत्कृष्ट संयोजनामुळे हा कार्यक्रम अतिशय यशस्वीरित्या पार पडला. उद्योगाचे आणि शिक्षणाचे मध्यप्रदेशातील एक महत्त्वाचे केंद्र असलेल्या या इंदूरमध्ये कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र सुरू करण्याचा येथील स्थानिक नागरिकांचा मानस आहे. या कार्यक्रमाद्वारे त्या दिशेने एक पाऊल टाकले गेले.

## इन्स्टिटयुट ऑफ इस्माइली स्टडीज् येथील शैक्षणिक कार्यशाळा

इन्स्टिट्युट ऑफ इस्माइली स्टडीज् या संस्थेने मुंबईमध्ये आयोजित केलेल्या एका शैक्षणिक उपक्रमामध्ये कृष्णमूर्ती फाऊंडेशन, इंडियाचे मुंबई केंद्र सहभागी झाले होते. शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांसाठी असलेला हा उपक्रम ५ मार्च २०११ रोजी आयोजित करण्यात आला होता. प्रा. डॉ. अभिजित पडते यांनी या कार्यशाळेचे संचालन केले.

शिक्षकांना एक निराळा दृष्टीकोन, विशेषत: कृष्णमूर्ती शिक्षणासंबंधी काय म्हणतात हे पाहणे, हा या कार्यशाळेचा उद्देश होता. पहिल्या सत्रात आजच्या शिक्षणात प्रशिक्षणावर कसा भर दिला जातो यावर चर्चा झाली. तंत्रज्ञानात तंत्र कसे वापरायचे हे प्रशिक्षण दिले जाते. उदाहरणार्थ डॉक्टर, इंजिनियर हे तंत्र व कौशल्य संपादन करतात. प्रशिक्षक व शिक्षक ह्यात फरक आहे. तंत्रज्ञान हे मर्यादित आहे, त्याला मोजमाप आहे. त्यामुळे प्रशिक्षकाचे काम ठराविक चाकोरीत असते. शिक्षक ज्याला 'शिकणे' अभिप्रेत आहे, तो विद्यार्थ्यांच्या संपूर्ण जीवनाला जबाबदार असतो. हे शिकणे जीवनव्यापी आहे. दुर्दैवाने आजचे शिक्षण मात्र तंत्र व माहिती ह्या पलीकडे कसे जाऊ शकत नाही ह्याबद्दल चर्चा झाली.

दुसऱ्या सत्रात शिक्षण हे भूतकाळ, पूर्व दृष्टीकोन व पूर्वग्रह ह्यांनी मर्यादित झाल्यामुळे अत्यंत जलद, गतीमान असलेल्या जीवनाला साथ देऊ शकत नाही, याकडे लक्ष वेधण्यात आले. बदलत्या काळाबरोबर चालण्यासाठी भूतकाळाला सोडता आले पाहिजे आणि त्यात विचार हा मोठा अडथळा कसा बनतो हे दाखविण्यात आले.

---

## शिवाजीपार्क नागरिक संघातील कार्यक्रम








कृष्णमूर्ती फाऊंडेशनच्या मुंबई केंद्राच्या वतीने शिवाजीपार्क येथील नागरिक संघाच्या सभागृहामध्ये कृष्णमूर्तींच्या इंग्रजी तसेच भाषांतरित मराठी, हिंदी, गुजराथी पुस्तकांचे तसेच डिव्हीडीज, एमपीथ्रीजचे प्रदर्शन आणि विक्री ६ ते ८ एप्रिल २०११ या दिवसांत आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाविषयी माहिती वृत्तपत्रांमधून प्रसारित करण्यात आली होती. तसेच शिवाजीपार्क परिसरातही माहितीपर पोस्टर्स लावण्यात आली होती.

७ एप्रिल रोजी कृष्णजींच्या बुद्धिस्ट स्कॉलर चोग्याम टुंगपा रिम्पोचे यांच्याबरोबर झालेल्या संवादाची *What is meditation ?* – ध्यान म्हणजे काय? या विषयावरची फिल्म मराठी उपशिर्षकांसह दाखविण्यात आली. तसेच ८ एप्रिल रोजी *The Challenge of change* या माहितीपटाचे *परिवर्तनाचे आव्हान* ही मराठी डबींग असलेली आवृत्ती दाखविण्यात आली. व्हिडिओ कार्यक्रमांना शिवाजीपार्क परिसरातील लोकांची मोठी उपस्थिती होती.

कृष्णजींच्या शिकवणुकीतील विशिष्ट विषयांनुसार निवडलेले लिखाण आणि त्याला पूरक अशी छायाचित्रे असलेली पॅनेल्सही ठेवण्यात आली होती. सभागृहाबाहेरही लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी प्रदर्शित केलेल्या पॅनेल्समुळे प्रतिसादात लक्षणीय भर पडली. उन्हाळी सुट्यांचे दिवस असल्यामुळे आपल्या मुलांना घेऊन मैदानात आलेल्या महिला कुतुहलाने पॅनेल्सवरचा मजकूर वाचत होत्या आणि त्यानंतर सभागृहात येऊन शिक्षणविषयक पुस्तके चाळत होत्या.

कृष्णजींची शिकवणी स्थानिक लोकांपर्यंत सहजपणे पोचविण्यासाठी अशा प्रकारचे परिचयात्मक कार्यक्रम निश्चितच उपयुक्त ठरतील हे या कार्यक्रमाच्या निमित्ताने जाणवले.

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, राजघाट- वाराणसी येथील अध्ययन कार्यशाळा:**

१३-१७ ऑगस्ट, २०११ Learning & Creativity हिंदी आणि इंग्रजीमधील कार्यशाळा - युवकांसाठी आणि शिक्षकांसाठी.

३० ऑक्टो.- ३ नोव्हें., २०११ **हिंदी संमेलन** १७-२१ डिसेंबर, २०११ Love, Beauty & Death

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, राजघाट फोर्ट, वाराणसी २२१ ००१.

दूरध्वनी: ०५४२ - २४४१२८९ / २४४०४५३ • ईमेल: kcentrevns@gmail.com • वेबसाईट: www.j-krishnamurti.org

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बंगलोर येथील अध्ययन कार्यशाळा:**

०९-१२ जून, २०११ Do I know myself? ०७-१० जुलै, २०११ Harmony in relationship

११-१४ ऑगस्ट, २०११ To listen, to look, to learn! ०८-११ सप्टेंबर, २०११ What is right action?

संपर्क: द स्टडी, व्हॅली स्कूल कॅंपस,१७ कि.मी. कनकपुरा रोड, थातगुणी पोस्ट, बंगलोर-५६००६२.

दूरध्वनी: ०८० - २८४३५२४३ • ईमेल: kfistudy@gmail.com • वेबसाईट: www.kfistudy.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,** वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८. ईमेल: thestudykfi@yahoo.com

**कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री** पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र

दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल - kscskfi@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

**आनंद विहार, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर** : आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे, पिनकोड- ४२१५०३, महाराष्ट्र, दूरध्वनी: ०८००७४३९७०२, (०२२) २५०१४०९४, २४२२३१९९ • ई मेल: zilog@vsnl.com

# तुमच्या मेंदूची मागणी सुरक्षिततेची असते

आणखी वेगळ्या प्रकारे मी हे मांडतो हं. मेंदूला अत्यंत गरज कशाची असते? कार्यशील होण्यासाठी, तो सुरक्षित आहे अशी भावना पाहिजे की नाही? मेंदूला सुरक्षितपणा पाहिजे हे खरे पण मग एखादी घटना अशी घडते, की सुरक्षितपणा, निवांतपणा आहे असे मानलेले होते तो भ्रम होता हे मेंदूला दिसून येते.

*डी:* मेंदू हे पाहू शकत नाही.

*एफ्:* संचित अशा अनुभवांचे व स्मरणांचे भांडार अशा अर्थाने आपण मेंदू गृहीत धरलेला आहे, पण ते भांडार बाहेर कोठेतरी असते व मेंदू फक्त एखाद्या भिंगासारखा असतो.

*पी:* मेंदूबद्दल असे अमूर्त व तात्त्विक पातळीवर बोलण्यापेक्षा आपण याच क्षणी आपल्या मनाकडे का पाहत नाही?

*कृष्णमूर्ती:* ऐका. तुमच्या मेंदूची मागणी सुरक्षिततेची असते. शारीरिकदृष्ट्या व वैचारिकदृष्ट्या मेंदूला खूपच सुरक्षितपणाची जरूरी असते. मी म्हणत आहे ते एवढेच आहे. मेंदूचे कार्य असे आहे. मुख्य मुद्दा आहे तो हाच आहे.

*डी:* मूळ प्रश्न कोणता आहे?

*पी:* मूळ प्रश्न असा आहे की काळाच्या क्षेत्रात काल, आज व उद्या असे हिशेब करीत कार्य करणारा जो मेंदू असतो, त्याचे कार्य चालू असताना, अजिबात वेगळे, 'दुसरेच काहीतरी' कार्य कसे काय घडू शकते व ते दुसरे 'पर-तत्त्व' काम करू लागले तर त्यावेळी घडते तरी काय?

*कृष्णमूर्ती:* मी सांगतो हं. जगण्यासाठी, तगून राहण्यासाठी मेंदूच्या पेशींना बचाव, संरक्षण यांची गरज असते. मेंदूच्या पेशी अशा तऱ्हेने टिकाव धरून राहण्याचे काम लक्षावधी वर्षे करीत आल्या आहेत. त्यात आता काय घडते ते पाहा. सुरक्षित वाटावे म्हणून मेंदूच्या पेशी म्हणतात की राष्ट्रीयत्व आवश्यक आहे. पण त्या राष्ट्रीयत्वामुळे जगात कलह व नाश ओढवतो. अशा तऱ्हेने, या ना त्या तऱ्हेने सुरक्षितपणा शोधणारे मन हे चाचपून पाहत असते, प्रयोग करीत असते नि जिथे तिथे ते अडकते. गुरू, राष्ट्रवाद, समाजवाद असल्या प्रयोगात ते अडकायला लागते व त्यातून उपटून मोकळे करावे लागते, कारण मुख्य पायाभूत गोष्ट अशी आहे की मनाला तगून राहण्याची, सुरक्षित राहण्याची आवश्यकता असते व त्यासाठी त्याने प्रगतीचा, पुनरावृत्तीचा, कालबद्ध मार्ग शोधून काढलेला असतो. ती मूलभूत गरज भागली गेली की काय घडते? आता सुरक्षेच्या बाबतीत आकलन हे पूर्णत: वेगळे होईल, नाही का?

*डी:* मनाची सुरक्षिततेची मागणी हीच तुमच्या प्रश्नाला विरोध करते.

*कृष्णमूर्ती:* नाही. मला माझी सुरक्षितता लाभलेली आहे, कारण मन म्हणत आले आहे की टिकून राहणे, अखंड राहणे, हे आवश्यक आहे. पण त्यासाठी नाना प्रकारचे भ्रम स्वीकारू नकोस. ते म्हणते की अंधविश्वास किंवा कल्पना यांची उभारणी करू नकोस. त्यांच्या आहारी जाऊ नकोस, कारण त्यात स्थैर्य व सुरक्षितता मुळीत नसते. झाडून टाक सगळे! ते सर्व विक्षेप आहेत; केवळ भ्रम आहेत. म्हणूनच ते मन पूर्णपणे सुरक्षित आहे. दुसऱ्या कोणत्या तरी विषयात किंवा वृत्तीत नव्हे, तर निजस्वरूपात, स्वत:च्या ठायीच सुरक्षित आहे. पूर्वी ते मन कित्येक गोष्टींत सुरक्षितता शोधीत होते. माझे कुटुंब, माझा देव, माझा अहंकार, स्पर्धा, साधना, उपासना, नाना तऱ्हांनी ते सुरक्षितपणाचा शोध घेत होते. पण कशाच्यातरी मदतीने सुरक्षितता ही मोठ्यात मोठी धोक्याची गोष्ट असते. मन त्याला फेकून देते. त्यामुळे ते डोळस असते. आंधळे नसते. ते स्वच्छ पाहू शकते. मग मन हे भ्रममुक्त, निर्हेतुक व सिद्धांतरहित असते. ते सुरक्षितपणा कोठेही शोधायला जात नाही म्हणूनच ते पूर्णपणे सुरक्षित असते. शंकराचार्य म्हणतात त्या अर्थी भ्रम, माया, मिथ्या असे नव्हे. पण केवळ हाच भ्रम की मी माझ्या कुळाच्या अभिमानात, ईश्वरसाधनेत किंवा गतकालीन ज्ञानात सुरक्षितता मिळवीन, ह्या भ्रमातून ते मन मुक्त असते.

मग या अवस्थेत पाहण्याचा 'विषय' कोणता? 'तत्' हेच पाहणारे असते.

*एफ्:* आपण घडलेले आहोत ते असे, आपल्या मानसिक व शारीरिक रचनेचे गुलाम आहोत, आपल्या देहधर्मांनी जखडलेले आहोत व त्यात असुरक्षित आहोत. आणि याकडे अगदी वेगळ्याच दृष्टिकोणातून पाहिजे पाहिजे. ही सुरक्षितता केव्हाही दुखावली जाऊ शकते, कारण आपली शरीरे फार नाजूक यंत्रे आहेत.

*कृष्णमूर्ती:* म्हणूनच फक्त शरीररक्षण एवढेच काम मी करीन. त्यात अहंपणाचा काही भाग नाही. शरीरयात्रेसाठी आवश्यक तेवढेच करायचे.

*एफ्:* दुखावला जातो तो अहंकार. अपमानाचा वगैरे संबंध त्याच्याशी असतो.

*कृष्णमूर्ती:* अहंपणाशिवाय, मी फक्त शरीरधारणेपुरतेच काम करीन. शरीराला स्नान घालीन, त्याची काळजी घेईन. आपल्याला वाटते की, आपण 'मीपणाच्या' साहाय्याने देहसंरक्षण करीत असतो. एकदा का आपण पूर्ण सुरक्षितपणाची, टिकून राहण्याची, मेंदूच्या सुरक्षितपणाची, अंतरंगात अगदी गांभीर्याने आवश्यकता ओळखून मान्य केली की इतर सर्व प्रश्नांची उकल आपण करू शकतो. मुख्य प्रश्न जरा वेगळ्या प्रकारे मांडूया. कोणतीही किंमत देऊन सुरक्षितपणाची मागणी करणाऱ्या मेंदूच्या पेशींशी, अत्यंत नूतन अशा दर्शनाचा काही संबंध असतो काय?

*पी:* माझे मन अशा प्रकारे काम करीत नाही. म्हणून तुम्ही म्हणता त्याकडे अवधान देणेही मला कठीण जात आहे. मेंदूच्या पेशी खरोखरीच जेव्हा कार्य करायच्या थांबतात, असा एखादा क्षण आपण गाठू शकतो का, याचा सूक्ष्मदर्शकातून पाहिल्यासारखा अभ्यास करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. तेथे सुरक्षितपणाचा किंवा असुरक्षितपणाचा काही संबंध नाही. यावेळी असले अवांतर प्रश्न मी काढले तर मुख्य गोष्टीपासून मी कुठेतरी भरकटेन.

मी आता तुमच्यासमोर उपस्थित आहे आणि मला हे समजायला हवे आहे की काळाची ही ऐहिक, आडवी गती कशी कशी चालते व मेंदूच्या पेशी कार्य करीत नाहीत अशी अवस्था असू शकते का? हे एक तत्त्व सोडून बाकीचे कोणतेही प्रश्न, पृच्छा, उत्तरे ही घोटाळ्यात पाडणारीच होतील.

*कृष्णमूर्ती:* मग, आपण जे काही बोललो ते बोललो, त्या पलीकडे जाऊन, तुम्ही असे म्हणता काय, की मेंदूच्या पेशी या ना त्या स्वरूपात अखंडपणे कार्यच करीत असतात?

*पी:* माझे म्हणणे असे की मी तुमचे बोलणे ऐकत आहे – माझ्या मनात कोणतीही हालचाल नाही.

*कृष्णमूर्ती:* का? तुम्ही अवधान देऊन ऐकता, तेथे आत मीपणाचे, ऐकणारे असे केंद्र नाही व फक्त श्रवणच आहे म्हणूनच ना?

*पी:* आता माझा प्रश्न असा की त्या अवस्थेत भूतकाळाचा बोजा किंवा प्रभाव असा कुठे असतो? हा प्रश्न मी केवळ काळाची समस्या सोडवून घेण्यासाठी करीत आहे, दुसरे काही नाही.

*कृष्णमूर्ती:* 'मी ऐकत आहे, संपूर्ण लक्ष देऊन ऐकत आहे' असे तुम्ही म्हणता. त्यावेळी त्या ऐकण्यात काळाचे अस्तित्व असते का?

*पी:* तेथे प्रतिक्रियाच नसते त्यामुळे मी मोजमाप कसे करणार?

*कृष्णमूर्ती:* अवधान असते, नुसते लक्ष असते तेव्हा काळ नसतो. कोणतीही हालचाल नसते. ही हालचाल, हा विचलितपणा, म्हणजेच मोजमाप, तुलना, एका स्थानाकडून दुसरीकडे प्रयाण करणे इत्यादी सर्व, अवधानात लहरी, कल्लोळ नसतात, चढउतार नसतात, मोजमाप घेणारे केंद्र नसते. पुढचा दुसरा प्रश्न आहे–की जुन्या मेंदूचे काय? त्यावर काय परिणाम झाला? तो तिथेच असू दे. तसाच. तुमचा प्रश्न तो आहे. काय घडले आता? (विश्राम) काय होते आहे, काय घडले ते मला कळले. अवधान हे मेंदूपासून वेगळे, अलग नसते. अवधान म्हटले म्हणजे त्यात सर्व शरीरही आले. मनासकट, इंद्रियांसकट सर्व शरीरच त्यात आले. सर्व त्या अवधानात आले. म्हणूनच त्या मेंदूच्या पेशी निवांत आहेत, प्रशान्त आहेत. जागरूक, जिवंत, तन्मय, अवधानात आहेत. जुन्या नव्याची तुलना करीत राहिलेल्या नव्हेत– तसे केलेत तर तुम्ही अवधान देऊ शकणार नाही. उत्तर आहे ते हे असे आहे. आणि त्या अवधानात मेंदू कार्य करू शकतो. ते अवधान म्हणजे शांती असते. तीच पूर्णावस्था, शून्यावस्था, रिक्तता. त्याला कोणतेही नाव द्या; त्याने काही फरक पडत नाही. त्या निष्पाप, निरागस रिक्त शांतीतून मेंदू कार्य करू शकतो. पण त्यात कोणत्यातरी विषयापासून, वस्तूतून, स्वतःची सुरक्षितता प्राप्त करण्याचा हव्यास धरणारा 'मी विचारकर्ता' असा मात्र नसतो.

*पी:* संपूर्ण मेंदूत रूपांतर घडले असा याचा अर्थ होतो काय?

*कृष्णमूर्ती:* नाही. जे घडले आहे ते मुळापासून पूर्ण परिवर्तन आहे. द्रष्टा उरलेलाच नाही.

*पी:* पण मेंदूच्या पेशी तर त्याच आहेत.

*कृष्णमूर्ती:* हां. सावधानपणे पाहा. या अशा शब्दांत अशा तऱ्हेने ते मांडू नका. सावधानपणे तुमच्या अंतरंगात पाहात राहा. अवधान म्हणजे पूर्ण अवधान–जड देह, भावना, मन, चित्त, पेशी– सगळे सगळे एकाग्र, एकतान आहे, जिवंत रसरशीतपणे एकवटलेले आहे. त्या अवस्थेत मीपणा नाही, केंद्र नाही, काळ नाही, द्रष्टा, अहंकार नाही. जुन्या पूर्वग्रहांचा आधार घेऊन वागणूक ठेवणारा मीपणा व त्याची कालाची जाणीव तिथे नाही, पण एका पातळीवर गतकाळ आहे. कारण मी गतकाळात शिकलो ती बोली भाषा तर उपयोगात आणीत आहे, किंवा मला इथून पलीकडच्या खोलीत जायचे आहे– (व्यावहारिक स्मृतीपुरता गतकाळ आहे– बरोबर ना?) मग मेंदूच्या पेशींचे काय होते? त्यांचे नोंदणीचे कार्य चालूच आहे पण तिथे 'मीपणा', अहंकार, नाही. आणि म्हणून, मेंदूच्या पेशींतला मीपणाचा जो अंश असतो तेवढाच झाडून टाकला गेला आहे.

*परंपरा आणि परिवर्तन,* संवाद २४, मुंबई १९७१

## विचारानेच घडविलेल्या गोष्टीत विचार सुरक्षितता शोधतो आहे

... तेव्हा आम्ही विचारणा करीत आहोत, हे जाणून की सारी माणसं, जवळजवळ संपूर्ण मानवजात ही कुठल्या ना कुठल्या प्रकारच्या कल्पनेला, काहीतरी समजूत निर्माण करणाऱ्या एखाद्या विचाराला, 'जे आहे' त्यावर प्रतिक्रिया असलेल्या एखाद्या अनुभवाला बिलगून राहते. तेव्हा सामान्यत: साऱ्या जगभर असं घडत आहे. बरोबर? तुमचा जर कम्युनिस्ट मतप्रणाली – किंवा खरं तर मार्क्सिझम् आणि लेनिनिझम्वर खोलवर विश्वास असेल, तर तुम्ही एका चाकोरीत अडकलेले असता. बरोबर? तुम्ही दुसऱ्या कशाचीही बारकाईने चौकशी करणार नाही, आणि असंच काही. तर मग त्यात सुरक्षितता मिळते का? तर मग विचार – नीट समजून घ्या – विचार, ज्याने या साऱ्या समजुती, मतप्रणाली, अनुभव, विभाजनं निर्माण केली आहेत, तो विचार सुरक्षितता देऊ शकेल का? माझा प्रश्न तुम्हाला समजतो का? कोणतंही काम करताना विचारांची साथ असतेच. खरं तर विचारांचा आधार घेऊनच तुमचे सगळे व्यवहार होत असतात. जिथे तुम्हाला विचारांची फार मोठी झेप घेणं अभिप्रेत असतं तिथे आणि जिथे तुम्ही सामाजिक क्रांती घडवून आणण्यामध्ये समाधान मानत असता किंवा असंच काही, तिथेही कोणत्या ना कोणत्या दिशेने गतिमान असलेले ते विचारच असतात. बरोबर? तर मग विचार हा मूलगामीरित्या मानसिक सुरक्षितता देतो का? तुम्हाला माझा मुद्दा कळतो आहे का? मी माझ्या गुरूकडे जाऊ शकतो. सुदैवाने मला कोणी गुरू नाही, पण मी एखाद्या गुरूकडे जाऊ शकतो. गुरूकडे जाण्याची कृती ही विचारावर आधारित आहे, या आशेने की तो मला या अनिश्चित जगात काहीतरी सुरक्षितता देईल, कोणत्यातरी आनंदाचा, अज्ञानातून मुक्तीचा मार्ग दाखवील. ही सारी विचाराची हालचाल आहे. बरोबर? आणि मी असं विचारतोय: विचार मानसिकदृष्ट्या सुरक्षितता देतो का? बरोबर? आणि तरीही विचाराला त्याची जागा आहे. पण आपण मानसिकदृष्ट्या सुरक्षितता आणू शकतो असं जेव्हा विचार गृहित धरतो तेव्हा तो भ्रमात राहत असतो.

तेव्हा विचार जो स्मृतीची प्रतिक्रिया असते, ज्ञान, ज्ञानाच्या रूपाने मेंदूमध्ये साठवलेले अनुभव, स्मृती, ती प्रतिक्रिया नेहमीच भूतकाळातून येत असते... आता, भूतकाळात सुरक्षितता आहे का? तुम्हाला समजतंय का? कृपा करून हे शोधण्यासाठी तुमची समज, तर्कशुद्धता, तुमची सारी ऊर्जा वापरा. भूतकाळ – जी परंपरा आहे – त्यात सुरक्षितता आहे का? परंपरा एक दिवसाची असो की हजारो वर्षांची असो, ती तरीही परंपराच असते, म्हणजे भूतकाळ – आणि विचाराची कोणतीही हालचाल, जी भूतकाळाचं सार असते, ती सुरक्षितता देऊ शकेल का? माझा मुद्दा तुम्हाला कळतोय का? त्यात खोलवर जा, पूर्ण विचार करून पडताळून पाहा. आपले धर्म हे भूतकाळावर आधारलेले आहेत– संघटित धर्म, त्यातील कर्मकांडं, ठाम मतप्रणाली आणि त्याबरोबर चाललेली सारी सर्कस, निरर्थक, हीच मूलत: परंपरा आहे, जो भूतकाळ आहे. आणि विचार हा शोधतो आहे – पाहा काय होतं आहे ते – विचार सुरक्षितता शोधतो आहे – त्या गोष्टीत, जी विचारानेच घडविलेली आहे. बरोबर?

... तर मग जेव्हा आपण म्हणतो की 'मला समजलं' तेव्हा ते शाब्दिक असतं किंवा खरोखर असतं. तुम्ही त्यातील सत्य पाहता आणि त्यातून मुक्त असता. तेव्हा त्यातील सत्य पाहणं हे प्रज्ञेचं सार आहे. बरोबर? तुम्ही हे पाहता की नाही याची मला शंका आहे. प्रज्ञा म्हणजे विवेकशक्ती नव्हे, तर्कबुद्धी, काळजीपूर्वक केलेलं वादविवादात्मक स्पष्टीकरण नव्हे, ती प्रज्ञा नव्हे. ते केवळ वेगवेगळ्या

रूपातील विचाराचं विषदीकरण असतं आणि विचार कधीही प्रज्ञावंत नसतो. तो जर तसा असता तर आपलं जग निराळं असतं. तेव्हा सत्यदर्शन म्हणजे प्रज्ञा. आणि त्या प्रज्ञेत संपूर्ण सुरक्षितता असते. कारण ती प्रज्ञा तुमची किंवा माझी नसते, ती प्रज्ञा संस्कारित नसते कारण आपण ते सारं संपविलेलं असतं. कारण आपण म्हटलंय की विचार स्वत:च्या हालचालीतून संस्कार निर्माण करत असतो. जेव्हा तुम्हाला हे समजतं तेव्हा ती खुद्द समजच प्रज्ञा असते आणि त्या प्रज्ञेमध्ये सुरक्षितता असते, त्यातून कृती असते. तुम्हाला यातलं काही समजलं का? तुम्ही तसे आहात का? तुम्हाला ती प्रज्ञा मिळाली आहे का? नाही, तुम्हाला 'मिळालेली' नाही, – तुमच्यामध्ये त्या प्रज्ञेचा जन्म होतो आहे का – एखाद्या अर्भकाप्रमाणे? जर तसं नसेल, तर मग इथे बसून या महाभागाचं बोलणं ऐकण्यात काय अर्थ आहे?

तर मग आपण या प्रश्नाबद्दल वेगवेगळ्या प्रकारे बोलू, वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये, जसं भीती, सुख, दु:ख, मृत्यू, ध्यान आणि ते सारं, पण या साऱ्याचं सार हे आहे – की विचार हा भूतकाळाची गती आहे, याचा अर्थ तो कालबद्ध आहे, आणि म्हणून तो मापनीय आहे. आणि जे मापनीय असतं ते मग अमाप असं जे सत्य आहे, ते कदापि शोधू शकत नाही आणि हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा तुमचं मन हे प्रत्यक्षपणे पाहील की जे जे काही विचाराने निर्माण केलेलं आहे, त्यात सुरक्षितता नाही आणि अशा बघण्यातच प्रज्ञा आहे. आणि जेव्हा अशी प्रज्ञा असते तेव्हा सारं काही अंत पावतं. मग तुम्ही या जगाच्या बाहेर असता; जरी तुम्ही जगात राहत असता, काहीतरी करण्याचा प्रयत्न करीत असता, तरीही ते सगळं करताना तुम्ही पूर्णपणे तिऱ्हाईत असता. तुम्हाला तुमच्या पूर्ण शक्तिनिशी शोधून काढायचं आहे, आपल्या संपूर्ण अस्तित्वासह बघायचं आहे की आपल्या प्रत्येकामध्ये ही प्रज्ञा आहे का. बरोबर?

*The Wholeness of Life,*
सानेन १९७७, भाषण १

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**
कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : (०४४) २४९३७८०३/७५९६,
ई-मेल : kfihq@md2.vsnl.net.in
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र** हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.

**संपर्क :-** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
बॉम्बे एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल,
मुंबई-४०००0६.दूरध्वनी - २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

**Statement about ownership and other particulars of Antarlahari Newsletter**

**Form IV**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | : | Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 2. Peridicity of Publication | : | Once in four months, (January, May, September) |
| 3. Printer's Name | : | Anand Limaye |
| Whether citizen of India | : | Yes |
| Address | : | India Printing Works, 42, G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. |
| 4. Publisher's Name | : | P. V. Dabholkar |
| Whether citizen of India | : | Yes |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 5. Editor's Name | : | Vasanti Padte |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai - 400 006. |
| 6. Name and address of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one percent of the total capital | : | Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai - 400 006. |

I, P. V. Dabholkar, hereby declare that the particulars given are true to the best of my knowedge and belief.

Sd
(P. V. Dabholkar)

कृष्णमूर्तीविषयीच्या काही वेबसाईटस्:
www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006. Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net • Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*